# प्रेस नोट

महाराष्ट्र पोलीस दलातील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्या मानसिकते मध्ये बदल करण्यासाठी प्रयत्न सुरु केले आहेत.पारंपारीक दबाव तंत्राचा वापर करुन परिस्थिती हाताळण्या पेक्षा भावनीक प्रज्ञाची जोड दिल्यानंतर अमुलाग्र बदल होतात हे स्पष्ट झाल्याने मा.श्री.सतिश माथुर, पोलीस मा.श्री. महासंचालक,महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे आदशान्वये व अपर पोलीस महासंचालक मा.श्री. जगन्नाथन यांच्या मार्गदर्शनामुळे पोलीसांना "भावनीक प्रज्ञा" या विषयावर प्रशिक्षण देण्यास सुरुवात केली आहे.

मा.पोलीस आयुक्त श्रीमती रश्मि शुक्ला,पुणे शहर यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक ११/९/२०१७ ते दि.१३/०९/२०१७ रोजी पुणे शहर पोलीस आयुक्तालयातील परिमंडळीय पोलीस अधिकारी व विभागीय पोलीस अधिकारी व वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांचेकरीता "भावनीक प्रज्ञावंत पोलीस" या विषयावरील ३ दिवसीय कार्यशाळचे आयोजन संस्कार भवन,पोलीस आयुक्तालय,पुणे शहर येथे करण्यात आले होते.सदर कार्यशाळेचे प्रमुख व्याख्याते म्हणुन डॉ. सोमनाथ घार्गे,प्राचार्य पोलीस प्रशिक्षण केंद्र, मरोळ मुंबई हे उपस्थित होते.त्यांनी समाजात नेहमीच उद्‌भवणाऱ्या कायदा व सुव्यवस्थेच्या किंवा अन्य कुठल्याही प्रसगांना पोलीसांना सहज तोंड देता यावे परिस्थिती खेळी-मेळी च्या वातावरणात हातळता यावी व पोलीसांच्या कामातुन व ताण-तणावातुन उदभवनाऱ्या परिस्थिवर कसे नियत्रंण करावे यावर मार्गदर्शन केले पोलीसवर्ग प्रचंड तनावात असतो त्यामुळे त्याची मानसीकता बिघडते त्याचा विपरीत परिणाम कामावर, शारीरीक स्वास्थावर तसेच कुटुंबावर व समाजावरही होतो म्हणुनच पोलीसांची प्रतिमाही मलीन होते.ही परीस्थिती सुधारण्यावर मार्गदर्शन करण्यात आले.

सदर कार्यशाळेचा लाभ पोलीस खात्यातील ३३ पोलीस अधिकाऱ्यांनी घेतला आहे.त्यामध्ये ५ पोलीस उप आयुक्त,११ सहायक पोलीस आयुक्त,१५ पोलीस निरीक्षक,२ सहायक पोलीस निरीक्षक उपस्थित होते.

सदरच्या प्रशिक्षणाची सांगता आज दिनांक १३.०९/२०१७ रोजी झाली असुन त्याची प्रस्तावना श्री.बी.जी.गायकर,पोलीस उप आयुक्त,मुख्यालय-१,पुणे शहर यांनी केली.सदर कार्यक्रम मा.श्री.रविद्र कदम सह पोलीस आयुक्त,पुणे शहर यांच्या अध्यक्षतेखाली व मा.श्री.साहेबराव पाटील,अपर पोलीस आयुक्त,प्रशासन,पुणे शहर यांच्या उपस्थितीत पार पडला.तसेच मा.श्री.देशपांडे अपर पोलीस आयुक्त गुन्हे,पुणे शहर व पुणे शहर आयुक्तालयातील सर्व पोलीस उप आयुक्त हजर होते . तसेच सहाय्यक पोलीस आयुक्त,आस्थापना,पुणे शहर श्रीमती उज्वला पिंगळे यांनी समन्वये अधिकारी म्हणुन कामकाज पाहीले आहे.यापुढे प्रशिक्षण घेतलेल्या पोलीस अधिकारी यांनी आपल्या हाताखालील पोलीस अधिकारी व कर्मचारी त्यांना प्रशिक्षण देऊन त्या दवारे सक्षम पोलीस दल बनविणे हा या प्रशिक्षाणामागील प्रमुख उद्देश आहे.


पोलीस आयुक्तालय, पुणे शहर
" भावनिक प्रज्ञावंत पोलीस कार्यशाळा "
Emotional Intelligence
Police Workshop
पोलीस आयुक्तालय, पुणे शहर
* कालावधी *
दि. ११/०९/२०१८ ते दि. १३/०९/२०१८
* मुख्य सादरकर्ता *
श्री. सोमनाथ घार्गे, प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र, मरोळ मुंबई.